# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/08/2023 (बुधवार) सकाळ


---

### घरफोडी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०८ किमी अंतरावर वार्ड क्र. ५ नगरधन ता. रामटेक येथे दिनांक ०८/०८/२०२३ चे १२/०० वा. ते १२/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— देवचंद शालीकराम बावनकुळे, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. ५ नगरधन रामटेक याचे वडील हे घराला कुलूप लावून ईलेक्ट्रीक बिल भरण्याकरीता गेले व बिल भरून परत आले असता एक अनोळखी इसम घरासमोर अंगणात पलंगावर बसला दिसला असता फिर्यादीचे वडील यांनी त्याला हटकले असता एका मुलाने दरवाजा उघडून दिल्याचे सांगीतल्याने फिर्यादीचे वडीलांनी आत जावून पाहीले असता दोन्ही लोखंडी आलमारी उघडे दिसले असुन सामान अस्ताव्यस्त दिसल्याने आलमारीचे लॉकर चेक केले असता लॉकर मध्ये ठेवलेले १) नगदी ५००/— रू चे १५४ नोटा एकुण किंमती अंदाजे ७७०००/—रू २) सोन्याची जुनी गरसोळी ८ ग्रॅम किंमती अंदाजे १००००/— रू ३) ५ तोळयाची चांदीची पायपट्टी, ४ तोळयाची चांदीची पायपट्टी १ तोळयाचे चांदीचे जोडवे एकुण १० तोळे प्रत्येकी ४००/— रू. प्रमाणे एकुण ४०००/— रू. असा एकुण ९१०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अनोळखी चोराने दरवाजाचे कुलूप तोडून घरात आत प्रवेश करून चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार पोस्टे रामटेक मो. नं. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत २४ कि. मी. अंतरावरील मौजा असोली शिवार जायका मोटर्स समोर दिनांक ०८/०८/२०२३ चे ०३.०० वा. ते ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— बिद्रेश साधुराम तारेज, वय ४५ वर्ष, रा. पांडेचवर ता. सगडी जि. आजमगड राज्य उत्तरप्रदेश यांनी आपले ट्रेलर क्र. एम. एच.—३१/एफ. सी. — ५८६२ हा दुरूस्ती करीता जायका मोटार असोली येथे घेवून गेले असता ट्रेलरचा मागील भाग सर्विस सेंटरच्या मागील बाजुला काढुन ठेवून ट्रक दुरूस्ती करीता दिले असता सकाळी उठुन फिर्यादी यांनी ट्रेलरच्या मागील काढुन ठेवलेल्या भागाची पाहणी केली असता मागच्या भागाचे उजव्या बाजुचे दोन टायर दिसुन आले नाही कोणीतरी अज्ञात इसमाने दोन्ही टायर किंमती अंदाजे २५,०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास हे पोलीस हवालदार यंगलवार मो. नं. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत डब्लुसिएल खदान नं. १ येथे दिनांक २७/०७/२०२३ चे ०८.०० वा. ते दिनांक ०७/०८/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— दुलीचंद तानबाजी वानखेडे, वय ५७ वर्ष, रा. डब्लुसिएल खदान नं. १ हा सुरक्षा रक्षक उपनिरीक्षक या पदावर नेमणुक असुन घटना वेळी डब्लुसिएल खदान नं. १ सावनेर येथुन लोखंडी गर्डर ९ नग ३०७००/— रूपये २) स्लाईडर किंमती २००००/— रूपये ३) एन. आर. व्ही १ नग किंमती ६०००/— रूपये असा एकुण ५६७००/— रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे ब. नं. ११६१ मो. क्र. ९८२२९३२२५३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**